# ओंकार विहिरीत पडल्याचे कळताच आई-वडिलांनी हंबरडा फोडला; मित्राचा 'कॅच आऊट' घेता घेता आयुष्याचीच विकेट घालवून बसला!

## दहावी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा कंदलगावात विहिरीत बुडून मृत्यू

## हृदयद्रावक घटनेने पंचक्रोशी अक्षरशः हळहळली

## मंगळवारपासून क्रिकेटचे 'ते' मैदान झाले सुनेसुने

## लाडका क्रिकेट यार कायमचा सोडून गेल्याने इतर मित्र शोकसागरात



कंदलगावची विहिर



मयत ओंकार चव्हाण

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**गावातील क्रिकेटच्या मैदानावर क्रिकेट खेळताना कॅच आऊट घेता घेता तो सरळ विहिरीत पडला. त्याला पोहता येत नसल्याने त्याचा विहिरीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पोटचा गोळा विहिरीत पडल्याचे मित्रांनी जेव्हा मृत ओंकारच्या घरी जाऊन त्याच्या आई-वडिलांना सांगितले. तेव्हा आईला हंबरडा फुटला, ती जमिनीवर कोसळली. वडिलांची बोबडी वळली. त्यांना काहीच सुचेना ते खाली बसले. दहावीची परीक्षा देऊन आलेला ओंकार सुट्टी लागल्याच्या आनंदात मनसोक्त क्रिकेट खेळत होता, याच टप्प्यावर नियतीला त्याचे हे मनसोक्त खेळणे आणि आयुष्य जगणे जणू मान्य नसावे. क्रिकेट खेळताना चेंडूचा झेल घेऊन मित्राला आऊट करुन आनंद मिळविण्याच्या नादात असलेल्या ओंकावर जणू काळाने झडप घातली. मित्राचा कॅच आऊट घेता घेता त्याची स्वत:चीच आयुष्याची कायमची विकेट तो घालवून बसला.**

विशेषत्वे, ओंकार याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे त्याच्या क्रिकेट यार मित्रांमध्ये सन्नाटा पसला. मंगळवारी (ता.२५) त्याच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार होताना त्याच्या सर्व मित्रांच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या. कंदलगावसह पंचक्रोशीत त्याच्या कायमच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्या क्रिकेटच्या मैदानावर तो क्रिकेट खेळायचा ते मैदान मंगळवारपासून अक्षरशः सुने सुने झाले. ओंकारच्या कायमच्या सोडून जाण्याने त्याचे कुंटुंबिय आणि मित्र परिवार शोकसागरात बुडाला आहे.

ओंकार संजय चव्हाण (वय १६) हा विजापूर रस्त्यावरील एका आश्रम शाळेत शिकत होता. दहावीची परीक्षा संपल्याने तो गावी कंदलगावला आपल्या घरी आला होता. आई-वडिलांना शेतीपयोगी साधने बनवण्याच्या कामात मदत करुन उरलेल्या वेळेत मनसोक्त क्रिकेट खेळण्याचा प्लॅन त्याने सुट्टीचा केला होता. त्यानुसार, सोमवार (ता.२४) संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ओंकार मित्रांसोबत क्रिकेट खेळण्यासाठी गेला होता. विहिरीच्या कडेला मित्राचा कॅच आऊट घेताना तो पाय घसरून खोल असलेल्या विहिरीत पडला. ओंकार विहिरीत पडल्याचे कळताच त्याच्या मित्रांनी गलका केला. ओंकारच्या आई-वडिलांसह कंदलगावच्या ग्रामस्थांना मित्रांनी तो विहिरीत पडल्याची माहिती दिली. मात्र रात्र झाल्याने ओंकारला विहिरीतून काढण्यात अडचणी आल्या. या घटनेचा तपास मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार विक्रम माने, हे करीत आहेत.

### ओंकारच्या आयुष्याची दोरीच तुटली होती. त्यामुळे सगळे प्रयत्न झाले असफल

क्रिकेट खेळताना मुलगा विहिरीत पडल्याची माहिती गावकऱ्यांना मिळताच गावकऱ्यांनी विहिरीकडे धाव घेतली. सोमवारी संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत शोध कार्य सुरु होते. विहिरीत पडलेला ओंकार सापडत नसल्याने आणि विहीर खोल असल्याने तत्काळ मंद्रूप पोलीस ठाणे येथे या घटनेची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस तातडीने घटनास्थळी आले. पोलीस आणि गावकऱ्यांनी तत्काळ मनगोळी येथील भूई कमलाकर डिरे, अनिल सले, अजय नगरे, हर्षद कांबळे, फारुख नदाफ यांच्या मदतीने रात्री उशिरा मृत ओंकारचा शोध घेऊन त्याला बाहेर काढले. मात्र शोध कार्य करण्यास उशीरा लागला तोपर्यंत ओंकारचा मृत्यू झाला होता. त्याच्या आयुष्याचीच दोरी तुटली होती. त्यामुळे ग्रामस्थ आणि मंद्रुप पोलिसांचे त्याला वाचविण्याचे प्रयत्न असफल ठरले.

### आई-वडिलांसह दोघा भावांचे अश्रू थांबता थांबेनात

घरातील हुशार ओंकार कायमचा सोडून गेल्याने त्याच्या कुंटुंबातील आई-वडिल तसेच त्याचे दोघे भाऊ शोकसागरात बुडाले आहेत. ओंकारचे दु:ख पचविणे खूप अवघड चालले आहे. त्यांच्या डोळ्यातील आश्रू थांबता थांबेनात.

### ओंकारच्या अकाली एक्झिट घटनेचे काही हायलाईट्स...

- शेतीपयोगी साधने बनविणारा घिसाडी चव्हाण परिवार हा मागच्या ७-८ वर्षांपासून कंदलगावात आहे वास्तव्यास
- मृत ओंकार हा चव्हाण परिवारातील दोन नंबरचा मुलगा होता, त्याला आणखे आहेत दोघे सख्खे भाऊ
- कंदलगावसह शेजारच्या गावांमध्ये शेतीपयोगी साधने विकून चव्हाण परिवाराची गुजराण आहे सुरु
- ओंकारने शिकावे, नोकरी करावी, त्याच्या नशिबी घिसाडी काम येऊ नये ही होती त्याच्या आई-वडिलाची इच्छा

### अत्यंसंस्कारावेळी सर्वांनाच आला हुंदका

मृतदेह शवविच्छेदनासाठी मंद्रूप येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला होता. शवविच्छेदन करून ओंकारचा मृतदेह मंगळवारी कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आला. अत्यंसंस्कारासाठी ओंकराच मृतदेह सरणावर ठेवला गेला तेव्हा उपस्थित सर्वांनाच हुंदका आला. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या ओंकारच्या आयुष्याचा सगळाच खेळ खल्लास झाला होता.दहावीत शिक्षण घेणाऱ्या ओंकारचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. ओंकारच्या अशा जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



सोलापूर : 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाचे दिग्दर्शक दिगपाल लांजेकर, अभिनेते अजय पुरकर, तेजस बर्वे अभिनेत्री नेहा नाईक यांनी मंगळवारी दैनिक 'सुराज्य' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळ्ये यांनी चित्रपटाच्या टिमचे स्वागत केले. यावेळी पत्रकार रोहन नंदाने.

## धक्का लागल्याच्या कारणावरून चाकूने मारहाण

✔ **सोलापूर** : पाई चालत जाताना धक्का लागल्याच्या कारणावरून चाकू आणि लाथाबुक्यांनी केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. ही घटना जोडबसवण्णा चौकातील राज हॉटेल जवळ बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली. अरफात अकील बागवान (वय २० रा. शास्त्रीनगर प्लॉट नंबर १३) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी वडिलांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. तो बुधवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास चौकातील राज हॉटेल जवळून पायी निघाला होत. त्यावेळी धक्का लागल्याच्या कारणावरून पंकज काटकर, सुधाकर पाटील आणि अन्य दोघांनी मिळून त्याला मारहाण केली. याची नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

## मोहोळचे भूमिपूत्र अण्णा बनसोडे बनले महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष

### सोलापूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

✔ मोहोळ/प्रतिनिधी



विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांना विधानसभेचे उपाध्यक्षपद मिळाल्यामुळे मोहोळ शहरात जल्लोष करण्यात आला. आमदार आण्णा बनसोडे हे मोहोळचे भूमिपुत्र असल्याने त्यांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अण्णा बनसोडे हे मोहोळ गावचे सुपुत्र आहेत. त्यांचे वडील नोकरीनिमित्त पिंपरी चिंचवड या भागांमध्ये स्थायिक झाले होते. अण्णा बनसोडे यांची कारकीर्द या भागातून सुरू झाली. कार्यकर्त्यांच्या सहकार्याने सुरुवातीला त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेवक पदाची निवडणूक लढवून ते विजयी झाले. पुढील काळात त्यांना स्थायी समितीचे अध्यक्षपदी मिळाले होते. सुरुवातीपासून पवार गटाशी संबंधित असल्याने ते अजित पवार यांचे निकटवर्तीय राहिले. अजितदादांनी त्यांच्या कामाची चुणुक बघून त्यांना २००९ मध्ये नवीन पिंपरी विधानसभा मतदारसंघातून आमदारकीची संधी देण्यात आली आणि ते विजयी झाले. त्यानंतर ते सलग तिनदा निवडून आले. सध्या चालू असलेल्या अधिवेशनात त्यांना विधानसभेचे उपाध्यक्ष पद दिल्याची घोषणा करण्यात आली. त्यानंतर मोहोळ शहरात जल्लोष करण्यात आला.

आजवर सोलापूर जिल्ह्याला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पदे जिल्ह्यात मिळाली. शेकापचे गणपतराव देशमुख यांना हंगामी सभापतीपद मिळाले होते. विधानसभेच्या उपाध्यक्षपदी सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही नेत्याची यापूर्वी कधीही वर्णी लागली नव्हती.

### मोहोळला कार्यकर्त्यांकडून जल्लोष

## चोरट्याने पळविली दुचाकी

✔ **सोलापूर** : होटगी रोड येथील सावरकर हॉस्पिटल येथून दुचाकी (क्रमांक एम. एच. १३ ई. जे. ३०५३) चोरून नेली. या प्रकरणी महेश नवनाथ कांबळे (वय ३५, रा. वडाळा, ता. उत्तर सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना (दि.२२) फेब्रुवारीला घडली.

## संक्षिप्त वृत्त

### जवळकर वस्ती येथे गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : प्रभाकर महाराज मंदिर परिसरातील जवळकर वस्तीत राहणाऱ्या एका ३६ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. दामोधर नागनाथ गायकवाड (वय ३६ रा .जवळकर वस्ती) असे मयताचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या वाशाला मंडप बांधण्याच्या कापडाच्या सहाय्याने गळफास घेतला होता. या घटनेचे नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

### जेऊर येथे बुधवारी टेम्पो उलटल्याने दोघे जखमी

✔ **सोलापूर** : वेगाने जाणारा छोटा हत्ती उलटल्याने दोघेजण जखमी झाले.हा अपघात जेऊर (ता.करमाळा) येथे बुधवारी सकाळच्या सुमारास घडला. अशोक सुभाष पिटेकर (वय ४० राहणार खादगाव ता.कर्जत) आणि कमल सर्जेराव जाधव (वय ३४ रा.शिंगेवाडी ता.माढा) हे दोघे जखमी झाले. ते दोघे आज बुधवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास जेऊर येथून शेटफळ येथे छोटा हत्ती वाहनातून निघाले होते. जेऊर पासून २ कि.मी. अंतरावर टेम्पो उलटल्याने दोघेजण जखमी झाले होते. त्यांना करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

### रस्ता दुभाजकाला धडकल्याने दुचाकी चालक जखमी

✔ **सोलापूर** : हैदराबाद महामार्गावरील बोरामणी नाक्याजवळ वेगाने जाणारी दुचाकी डिव्हायडरला धडकल्याने विश्वेश शंकरया हिरेमठ (वय २३ रा.शेळगी) हा तरुण गंभीर जखमी झाला. हा अपघातत मंगळवारी रात्री बारा वाजेच्या सुमारास घडला. तो दुचाकीवरून अशोक चौक ते घराकडे निघाला होता. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जोडभावी पेठ पोलिसात या अपघाताची नोंद झाली आहे.

# माढा तालुक्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला भगदाड

### मोहिते-पाटील निकटवर्तीय संजय कोकाटे तुतारी करणार बाजूला

## निवडणुकांनंतर माढ्यात फिरली भाकरी; बारामतीकरांचा शिलेदार शिंदे शिवसेनेत

✔ सोलापूर/प्रतिनिधी



संजय कोकाटे



एकनाथ शिंदे



शरद पवार

माढा लोकसभा अन् विधानसभेत राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठे भगदाड पडणार आहे. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांनतर माढ्यात फिरली भाकरी आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र शरद पवार गटाला 'जोर का झटका' लागणार आहे. बारामतीकर शरद पवार आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांचा विश्वासू आणि निकटवर्तीर शिलेदार संजय कोकाटे हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाची तुतार बाजूला करुन शिंदे शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेणार आहेत.

लोकसभेच्या विजयानंतर महायुतीला सोडून महाविकास आघाडीत गेलेले अनेक नेते आता परत घर वापसी करू लागल्याचे पहायला मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातील संजय कोकाटे यांनी शरद पवार गटाचा राजीनामा देत बुधवार (ता.२६) शिंदे सेनेत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. संजय कोकाटे हे लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले होते. यामुळे पवार गटाला माढा विधानसभा जिंकण्यात मोठी मदत झाली होती. मात्र, आता संजय कोकाटे यांनी शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतलाय.

### शरद पवार गटाला 'जोर का झटका'

### आगामी निवडणुकांवर परिणाम

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा समावेश आहे. माढा तालुक्यात नेवटर्कचे जाळे असलेल्या संजय कोकाटे यांच्या शरदचंद्र पवार गट सोडण्याने या निवडणुकांवर परिणाम होऊ शकतो. शिंदे शिवसेना गटासाठी त्यांचे नेतृत्व या निवडणुकांसाठी उपयोगी ठरु शकतं.

### पक्ष संघटनेतील निष्क्रियतेला वैंताग

पक्षांतर्गत गटबाजी आणि पक्ष संघटनेतील निष्क्रियतेला वैतागून संजय कोकाटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सदस्यत्वपदाचा राजीनामा पक्षाध्यक्षांकडे सुपूर्द केला आहे. आज ते मुंबई येथील मुक्तगिरी बंगल्यावर संध्याकाळी सहा वाजता पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.संजय कोकाटे यांच्या जाण्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का मानला जात असून माढा विधानसभेसह माढा लोकसभेत संजय कोकाटे यांची मोठी ताकद आहे.